महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे ४११०१६.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र : तंशिविकापु/विवि/प्रवेश२०२४-२५/पदविका सुविधा केंद्र/२०२४/ 1992

दिनांक : ०२.०५.२०२४
02 MAY 2024

**परिपत्रक:**

**प्रति,**
**प्राचार्य,**
**या विभागीय कार्यालयाच्या अखत्यारीतील**
**सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित / खाजगी विनाअनुदानित**
**प्रथम व थेट द्वितीय वर्ष पोस्ट एसएससी व पोस्ट एचएससी**
**पदविका अभ्यासक्रमांच्या संस्था.**

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील प्रथम व थेट द्वितीय वर्ष पोस्ट एसएससी व पोस्ट एचएससी पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेसाठी सुविधा केंद्रांची (Facilitation Centers - FC) शिफारस करणेबाबत..**

संदर्भ : १) शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१९/(प्र.क्र.०६/१९)/तांशि-५, दिनांक ०६.०२.२०१९.
२) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र. १०/एडीएम/पदविका FC शिफारस/२०२४/१८२ दिनांक २५.०४.२०२४.

उपरोक्त विषयास अनुसरुन, संदर्भाधित शासन निर्णयान्वये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील विविध पदविका स्तरावरील अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने आवश्यक ती गोपनीयता राखून, उचित रितीने, विद्यार्थी व पालक यांचे हित विचारात घता प्रचार, प्रसार व जागरुकता निर्माण करुन प्रक्रिया राबविण्याबाबत सर्व निर्णय घेण्याचे अधिकार संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना प्रदान करण्यात आले असून त्यासाठी त्यांना सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे, त्यास अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील पदविका अभ्यासक्रमांची केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने संचालनालयामार्फत राबविण्यात येणार आहे.

त्याअनुषंगाने प्रथम/थेट द्वितीय वर्ष पोस्ट एसएससी आणि पोस्ट एचएससी पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेसाठी पुणे विभागातील सुविधा केंद्राची शिफारस करण्याकरिता संदर्भ क्रमांक २ मधील पत्रान्वये या विभागीय कार्यालयास सूचित करण्यात आलेले आहे. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील कार्यान्वित असलेल्या ज्या सुविधा केंद्रांनी सुविधा केंद्र म्हणून केलेले काम समाधानकारक नव्हते तसेच संस्थांबाबत शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यांचे प्रलंबित प्रश्न व त्याअनुषंगाने न्यायालयीन प्रकरण, गतवर्षी सुविधा केंद्राने विद्यार्थ्यांचे अर्ज भरताना केलेल्या चुका/ऑनलाईन अर्ज भरताना परस्पर केलेले फेरफार, प्रवेशाबाबत संस्थेवर झालेली कारवाई तसेच ज्या सुविधा केंद्रांवर ५० पेक्षा कमी अर्ज कन्फर्म झाले असतील अशा सुविधा केंद्रांची शिफारस संचालनालयाकडे करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

ज्या पदविका संस्था शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता नवीन सुविधा केंद्र मिळविण्यासाठी इच्छुक असतील अशा संस्थांबाबत सदर परिसरातील सुविधा केंद्रांची गरज आहे काय? तसेच संस्थेत पदविका अभ्यासक्रम सुरु होऊन कमीत कमी पाच वर्षे पूर्ण झालेली आहे काय या बाबींची पूर्तता करणा-या संस्थांनी आपले सुविधा केंद्र सुरु करणेबाबतचे प्रस्ताव **दिनांक १४.०५.२०२४ पर्यंत ई-मेलद्वारे (ropune@dtemaharashtra.gov.in)** या विभागीय कार्यालयास सादर करावे. याआगोदर नवीन सुविधा केंद्रांचा प्रस्ताव या विभागीय कार्यालयाकडे दिला असल्यास त्याची एक प्रत पुन्हा ई-मेलद्वारे या विभागीय कार्यालयाकडे सादर करावी. दि. १४.०५.२०२४ नंतर प्राप्त होणा-या प्रस्तावांवर कोणतीही कार्यवाही होणार नाही याची नोंद संस्थानी घ्यावी.

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

D:\Yogesh Kelkar\Admission 2024-25\Diploma\FC\Circular to inst.docx